MHLA120001982024

**नि. दि.दा.क्र.२६/२०२४ मधील नि.क्र.१९ वरील आदेश**
**सुजाता वि. लहू**

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.१, ४ ते ८ व १४ यांनी जवाब दावा दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन त्यांचेविरुध्द झालेला विना कैफियत/जबाब (No WS/Say) चा आदेश बाजुला करण्यासाठी (set-aside) दाखल केलेला आहे. त्यावर वादीतर्फे लेखी खुलासा मागविण्यात आला.

२. युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुत दावा हा मालकी घोषीत होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. परंतु अनेक संधी देवून सुध्दा सदर प्रतिवादींनी वादीचे दावे अर्जास लेखी कैफियत न दिल्यामुळे त्याचे विरुध्द विनाकैफियत आदेश पारीत केलेला आहे. परंतु असे जरी असले तरी सदर प्रतिवादींना कैफियत दाखल करण्याची नैसर्गिक न्यायतत्वास अनसरुन संधी देणे गरजेचे आहे. एकंदरीत सदर अर्जात नमुद केलेले कारण व कायदेशिर बाब विचारात घेता सदर प्रतिवादींना त्यांच्या बचावाची संधी देणे आवश्यक आहे. परंतु असे असले तरी सदर जवाब दावा दाखल करण्यास प्रतिवादींना बराच विलंब झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज प्रतिवादींवर खर्च लावून मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रतिवादींचा सदर अर्ज नि.क्र.१९ वादींना रक्कम रु.१०००/- (रक्कम रुपये एक हजार) खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2024.09.21 17:31:32 +0530

**(आर. डी. खराटे)**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, निलंगा

दि.२१/०९/२०२४